दिनांक १९/०१/२०१९


## गुन्हे अन्वेषण विभाग, घटक–१, ठाणे शहर.

दुरध्वनी कमांक–०२२२५३४३५६५, Email - cp.thane.thanecrime@mahapolice.gov.in


## " बिबटया या वन्यजिव प्राण्याचे कातडे १० लाख रूपयास विकीसाठी आलेल्या गुन्हेगारास गुन्हे शाखा, घटक – १,ठाणे कडुन अटक"

———००००००———

दिनांक–१८/०१/२०१९ रोजी गुन्हे शाखा,घटक–१ ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितीन ठाकरे यांना बातमी मिळाली की, ठाणे (पश्चिम) कळवा, पारसिक सर्कल येथील अमित गार्डन हॉटेलजवळ, एक इसम त्याचेकडे असलेल्या बॅगमध्ये "बिबटया" या वन्यजिव प्राण्याचे कातडे विकी करण्याकरीता दिनांक १८/०१/१९ रोजी सकाळी ११:०० वाजताचे दरम्यान येणार आहेत. सदर बातमीचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,घटक–१ ठाणेचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अमित गार्डन हॉटेलजवळ, पारसिकनाका,कळवा, ठाणे येथे सापळा कारवाई करून ११:२५ वाजता इसम नामे दिलीप लुमाजी वायळ, वय ३० वर्षे, रा.– स्वत:चे घर, मु.पो. कोळेवाडी, ता. राहुरी, जि.–अहमदनगर यांस ताब्यात घेवुन त्यांचेकडील काळया रंगाचे सॅग बॅगची तपासणी केली असता एक बिबटया या वन्यजिव प्राण्याचे सोलुन काढलेले, कडक झालेले व सुकवलेले कातडे, मिळुन आले. सदर कातडे बाबत नमुद आरोपीत इसमांकडे विचारपुस करता सदरचे कातडे तो १० लाख रूपयांना विकी करण्याकरीता ठाणे येथे आले असल्याची माहीती त्यांनी दिली.

आरोपीत इसमांकडे मिळुन आलेल्या वन्यजीव प्राण्याचे कातडयाची वन्यजिव गुन्हे नियंत्रण विभाग, ठाणे यांचे कडुन खात्री केली असता त्यांनी कातडयाचे निरीक्षण करून ते बिबटया या वन्यजीव प्राण्याचे कातडे असल्याचे खात्रीपुर्वक सांगितले. त्यानंतर वरील आरोपीत याचे विरुध्द कळवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. II ३३/२०१९ वन्यजिव संरक्षण कायदा १९७२ चे कलम–९,३९,४८(अे),४९,५१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अविराज कुराडे हे करीत आहेत.

वरील कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री.विवेक फणसळकर, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार, गुन्हे, मा. पोलीस उप आयुक्त श्री. दिपक देवराज, गुन्हे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. बाजीराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक–१, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक रणवीर बयेस, सपोनि अविराज कुराडे, पोहवा शिवाजी गायकवाड, पोहवा संभाजी मोरे, पोना रिझवान सय्यद,पोना विक्रात कांबळे, पोना संजय दळवी व पथकाने केली आहे.

———००००———


महाराष्ट्र पोलीस


महाराष्ट्र पोलीस